**दिनांक : 28/9/25**

**विषय : संस्थेच्या पुनर्निर्माण प्रकल्पात फ्लॅट्स / डुप्लेक्स च्या अलोटमेंट ची प्रक्रिया संबंधी सभासदांचा मेळावा.**

आज सकाळी 10 वाजता संस्थे च्या मधुकर जोशी सभागृहात फ्लॅट्स तसेच डुप्लेक्स चे अलोटमेंट कसे करणार आहोत हे समजून घेण्या साठी सभासद आणि त्यांच्या कुटुंबीयांचा एक मेळावा घेण्यात आला. ह्यात 97 सभासद आणि कुटुंबीय उपस्थित होते.

सर्वप्रथम सचिव श्री पटवर्धन यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत करून श्री नेवाळकर यांना मेळाव्याचे उद्दिष्ट विषद करण्यास सांगितले.

श्री नेवाळकर यांनी सांगितले कि पुढील आठवड्यात सभासदांना एक फॉर्म देण्यात येईल त्यात सभासदांनी पुनर्निर्माणात मागितलेल्या सदनिकांसंबंधित सर्व माहिती असेल आणि त्या अनुसार सभासदाने त्याच्या इच्छे प्रमाणे तीन पर्याय भरून ते फॉर्म पंच समिती कडे निर्धारित वेळेत द्यायचे आहेत. पंच समिती त्याची पोच पावती सही शिक्या निशी सभासदाला देईल. ही पावती सभासदाने येत्या 2 नोव्हेंबर रोजी, शेजारच्या मुनोत सभागृहात होणाऱ्या अलॉटमेंट च्या विशेष सर्व साधारण सभेत टेली करण्या साठी दाखविणे गरजे चे असेल.

ह्या सभेत, सहकारी विभागाच्या अधिकाऱ्याच्या उपस्थित, आज दाखविल्या जाणाऱ्या सादरीकरणाच्या अनुषंगाने, अलोटमेंट ची प्रक्रिया राबविण्यात येईल आणि त्यात मिळणाऱ्या सदनिका मान्य करणे सर्व सभासदांना बंधनकारक असेल. जे तीन अग्रक्रम सभासद देणार आहेत ते मजल्या (Floor) साठी असतील. तसेच सर्व स्प्लिट फ्लॅट्स जोडी चे शेजारी शेजारी असतील. वेग वेगळ्या मजल्यांवर नाही.

ही प्रक्रिया पूर्ण झाल्या वर जर एकाच ग्रूप चे सभासद आपसात त्यांना अलोट झालेल्या सदनिका बदलू इच्छितात तर ते त्यांना तिथेच SGB मधेच ठरवावे लागेल आणि अधिकाराच्या संमती ने त्यांचे allotment बदलून घेता येईल.

ह्या नंतर आपले सभासद श्री यशवंत केंजळे यांनी PPT presentstion च्या मदतीने allotment ची प्रक्रिया कशी असेल ते सा-उदाहरण समजून सांगितले. त्यांच्या अनुभवा प्रमाणे जवळपास 50 टक्के allotments पहिल्या राऊंड मधेच होतात आणि तीन राऊंड संपल्या नंतर फक्त 10 ते 12 टक्के allotments शेवटी चिठ्ठी

टाकून होतात. श्री केंजळे हे डेमो दाखविताना त्या बद्दल डिटेल्स पण सांगत होते त्या मुळे उपस्थितांना ती प्रक्रिया समजणे सोपे झाले आणि पुढे बरेच सभासद त्यात सहभाग पण घेऊ लागले.

श्री पटवर्धन यांनी स्पष्ट केले की जे सभासद निर्दिष्ट फॉर्म भरून देणार नाहीत त्यांना प्रक्रियेत शेवटच्या लॉट मधे ठेवण्यात येईल आणि त्या प्रमाणे झालेले allotment स्वीकारणे त्यांच्या वर बंधन कारक असेल.

जे सभासद देशा बाहेर आहेत त्यांना हे फॉर्म्स e mail वर पाठविण्यात येतील आणि त्यांनी त्यांचे फॉर्म्स सोसायटी च्या अधिकृत e mail id वर निर्देशित तारखे च्या आत पाठवायचे आहेत. अश्या सभासदांना
2 नोव्हेंबर च्या SGB त त्यांच्या प्रतिनिधी ला भाग घेण्यास पाठवता येईल. मात्र ह्या प्रतिनिधी संबंधी लेखी माहिती त्याच्या आधार कार्ड च्या कॉपी सकट पंच समिती ला कळविणे बंधनकारक असेल. इतर सभासद जे सोसायटीत अगर पुण्यात राहत नाही त्यांना ई मेल वर फॉर्म पाठवले असले तरी त्यांनी त्यांचे फॉर्म प्रत्यक्ष येऊनच द्यायचे आहेत.

श्री नेवाळकर यांनी असे ही स्पष्ट केले की एखाद्या ग्रूप चे सभासद एकत्रित येऊन सहमती ने त्यांना मिळणाऱ्या मजल्या चे निर्धारण करीत असले तर त्यांना तसे करता येईल मात्र 2 नोव्हेंबर
च्या SGB मधे त्यांनी तसे ठरल्याचे प्रत्येक संबंधित सभासदाच्या सही ने लेखी द्यायला हवे.

ह्या नंतर ज्या सभासदांना काही शंका होत्या त्या दूर करण्यात आल्या. शेवटी सर्वांना धन्यवाद देऊन तसेच 2 नोव्हेंबर च्या विशेष सर्वसाधारण सभेत सर्व सभासदांनी उपस्थित राहण्याची आठवण करून
सचिवांनी मेळावा संपण्याचे जाहीर केले.

पंच समितीच्या वतीने